स्थापना 2005

अनामप्रेम

# ANAMPREM

# ANNUAL REPORT

## 2024




# अनामप्रेम

## विश्वस्त मंडळ



डॉ. गिरीश कुलकर्णी
(संस्थापक)


मा. अरूण शेठ
(पालक)


इंजि. अजित माने
(अध्यक्ष)


डॉ. बापूसाहेब कांडेकर
(उपाध्यक्ष)


डॉ. प्रकाश शेठ
(उपाध्यक्ष)


मा. गोपीनाथ सरफरे
(उपाध्यक्ष)



मा. अनिल गावडे
(सचिव)


मा. राधाताई कुलकर्णी
(खजिनदार)


डॉ. सायली सतीश सोमण
(सहसचिव)



मा. नितीन थाडे
(सहसचिव)



डॉ. रवींद्र सोमाणी
(मा. विश्वस्त)


सी.ए. अशोक पितळे
(मा. विश्वस्त)


ॲड. श्याम असावा
(मा. विश्वस्त)


मा. अविनाश बोपर्डीकर
(मा. विश्वस्त)


डॉ. मेघना मराठे
(मा. विश्वस्त)


मा. स्वाती रानडे
(जेष्ठ मार्गदर्शक)


श्री. जे.आर. मंत्री
(जेष्ठ मार्गदर्शक)



# सशक्तीकरणातून स्वाभिमानाकडे - प्रगतीची नवी उंची

दिव्यांग व्यक्तींना सहानुभूतीपेक्षा संधी, सन्मान आणि स्वावलंबन देण्याच्या ध्येयाने सुरू झालेली अनामप्रेम संस्थेची वाटचाल यंदा अधिक व्यापक आणि परिणामकारक झाली आहे. समाजाच्या विश्वास, सहकार्य आणि सहभागाच्या बळावर आम्ही सक्षमीकरणाच्या दिशेने नवी उंची गाठली आहे. प्रत्येक उपक्रमामागे दिव्यांग बांधवांच्या स्वाभिमानाला बळ देण्याचा ठाम विचार आहे.

यावर्षी २२ दिव्यांग बांधवांची मतदार नोंदणी पूर्ण करून त्यांना लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभागी होण्याची संधी मिळवून दिली. हा केवळ प्रशासकीय उपक्रम नसून स्वाभिमान आणि नागरिकत्वाची जाणीव दृढ करणारा महत्त्वपूर्ण टप्पा आहे. विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या भेटी व मार्गदर्शनामुळे संस्थेच्या कार्याला नवे बळ आणि दिशा मिळाली.

डिजिटल साक्षरतेच्या दिशेने आयोजित MS-CIT कोर्समध्ये सर्व विद्यार्थी उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले, ज्यामुळे त्यांच्या आत्मविश्वासात आणि रोजगारक्षमतेत लक्षणीय वाढ झाली आहे. आदरणीय श्री. अरुण शेठ (भाई) यांच्या सहकार्याने अस्थिव्यंग कार्यकर्त्यांना दोन दुचाकी वाहने देण्यात आली; त्यामुळे सेवाकार्य अधिक गतिमान आणि प्रभावी झाले आहे.

कु. श्रावणी हिने अंशतः अंधत्वावर मात करत अथक परिश्रमांच्या जोरावर सांख्यिकी विभाग, अहमदनगर येथे शासकीय सेवेत प्रवेश मिळवला—हे यश संपूर्ण अनामप्रेम परिवारासाठी अभिमानास्पद आणि प्रेरणादायी आहे. मराठवाडा प्रकल्पाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा करत ग्रामीण भागातील दिव्यांग विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण, कौशल्यविकास आणि पुनर्वसन सेवा अधिक प्रभावीपणे पोहोचविण्याचा संकल्प दृढ केला. दरवर्षीप्रमाणे आयोजित वैद्यकीय तपासणी शिबिरातून विद्यार्थ्यांच्या आरोग्याची नियमित काळजी घेण्याची परंपराही यंदा कायम राखली.

सन २०२४ हे वर्ष कार्याचा विस्तार, गुणवत्तेची जपणूक आणि सर्वांगीण विकासाच्या बांधिलकीची पुनःप्रत्ययकारी साक्ष ठरले आहे. आमचे ध्येय दानाधारित नव्हे, तर स्वाभिमानाधारित समाजनिर्मितीचे आहे. शिक्षण, आरोग्य, कौशल्यविकास आणि रोजगारनिर्मिती या चार स्तंभांवर आधारित अनामप्रेमचे कार्य आगामी काळात अधिक व्यापक व परिणामकारक करण्याचा आमचा निर्धार आहे.

आपला विश्वास आणि सहकार्य हेच आमच्या वाटचालीचे खरे बळ आहे.

इंजि. अजित माने, अध्यक्ष - अनामप्रेम

# अनामप्रेम

## ध्येयदृष्टी

दिव्यांग व्यक्ती आणि बालकांना शिक्षण, आरोग्य, व्यावसायिक कौशल्ये व सामाजिक समानतेच्या संधी उपलब्ध करून देत, त्यांच्या आत्मविश्वास, सन्मान आणि स्वावलंबनाला बळकटी देणारी समृद्ध व शाश्वत सामाजिक-आर्थिक प्रणाली निर्माण करणे आणि समर्थ जीवन जगण्यास सक्षम करण्यासाठी अनामप्रेमची कटिबद्धता.

## कार्यउद्देश

दिव्यांग व्यक्ती व बालकांसाठी शिक्षण, आरोग्यसेवा, पुनर्वसन, कौशल्यविकास, समुपदेशन व सामाजिक समावेशनाच्या गुणवत्तापूर्ण आणि सुलभ सेवांचे जाळे उभारणे; समुदाय, तज्ञ संस्था व शासन यांच्या सहकार्याने टिकाऊ उपक्रम विकसित करणे; आणि प्रत्येक लाभार्थ्याच्या क्षमतांची वाढ करून त्यांना स्वावलंबन, सन्मान आणि सक्रिय सामाजिक सहभागासाठी मार्गदर्शन करणे.












स्थापना 2005
अनामप्रेम

# अनामप्रेम

दिव्यांग बांधवांचा आशाकिरण

## समाजसेवेची दखल : अनामप्रेमच्या कार्याची माध्यमांतून प्रशंसा

मराठवाडा साथी
epaper.marathwadasathi.com
18 Mar 2024 - Page 2

### अंध-अपंग-मुकबधिर-अस्थिव्यग्न बांधवांसाठीचा आशाकिरण "अनामप्रेम"



सकाळ

### 'अनाम प्रेम'च्या मुलांना स्नेहभोजन

छत्रपती संभाजीनगर : जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेश प्रसिद्धीप्रमुख ॲड. ... यांनी अनाम प्रेम या दिव्यांग संस्थेमध्ये वाढदिवस साजरा करून तेथील ... स्नेहभोजन दिले. यावेळी जिजाऊ ब्रिगेड प्रदेश सदस्य प्रा. लता ... जिल्हाध्यक्ष संगीता भुजंग, पश्चिम जिल्हाध्यक्ष मेघा थोरात, सदस्य ... अनाम प्रेम संस्थेचे प्रकल्पप्रमुख जे. आर. मंत्री व विद्यार्थी उपस्थित ...

Aurangabad, Aurangabad-Today
06/04/2024 Page No. 2

### अनामप्रेम संस्थेत जागतिक दिव्यांग दिन उत्साहात

छत्रपती संभाजीनगर, (संजवार्ता ब्युरो): जागतिक दिव्यांग दिनी अनामप्रेम संस्थेत वस्तिगृहात एका छोटेखानी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



### "अनामप्रेम" संस्थेला आटा चक्कीची भेट



### डॉ. शेठ यांच्या वाढदिवसानिमित्त 'अनामप्रेमच्यावतीने अमृतमहोत्सव व अभिष्टचिंतन सोहळा संपन्न



### थेचे अध्यक्ष इंजि.अजित माने यांचे प्रतिपादन, दिव्यांग विद्यार्थ्यांना सर्वतोपरी मदत करणार

## गुण ओळखून जीवनाकडे सकारात्मकतेने पाहा



#### पडद्याच्या आजाराने अंधत्व आलेलेही नेत्रदान करू शकतात

डोळ्याच्या पडद्याच्या या आजाराने व रात आंधळेपणाने अनेक जण अंध होतात. परंतु असे अंध नेत्रदान करू शकतात. बुबुळाच्या विकाराने अंध झालेल्या ना नेत्रदानाची गरज असते. पडद्याच्या व रात आंधळेपणाच्या आजाराने अंध झालेल्या रुग्णांनीही व डोळसांनी नेत्रदान करावे, असे आवाहन अजय धोपावकर यांनी केले. मला पडद्याच्या आजाराने अंधत्व आलेला आहे. त्यामुळे मी देखील नेत्रदान करू शकतो, तसा संकल्प मी केला आहे, असे ते म्हणाले.

## समाज कार्यकर्त्याचा अमृत महोत्सव उत्साहात

### अनामप्रेमने केला डॉ. शेठ यांचा सन्मान



अहमदनगर (प्रतिनिधी) – समाजकार्यात अखंड कार्यरत असलेल्या ज्येष्ठाचा अमृत महोत्सवी अभीष्टचिंतन सोहळा नुकताच येथील अनामप्रेम संस्थेत उत्साहात झाला. पुणे येथील डॉ. प्रकाश माधव शेठ यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त अनामप्रेमच्यावतीने त्यांचा अमृत महोत्सव व अभीष्टचिंतन सोहळा आयोजून केला. त्यांचा जरी ७५ वा वाढदिवस असला तरी ते मनाने व कामाने खरोखरच २५ वर्षांचे असल्यासारखे आहेत. या वयातदेखील त्यांचा सामाजिक कामाप्रती ...

#### समाजाचे देणे लागतो : डॉ. शेठ

डॉ. प्रकाश शेठ यावेळी म्हणाले की, समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो या भावनेतून मी काम करत आहे. स्नेहालयाच्या डॉ. गिरीश कुलकर्णींच्या माध्यमातून काम सुरू केले. समाजकार्य करताना अनेक समस्या समजल्या. समाजातील विविध दुर्लक्षित लोकांकरीता काही करता येईल का, हे मी पाहिले. ज्यांना गरज ...

२

## 'समाजाचे देणे लागतो या भावनेतून काम करतोय'

प्रतिनिधी | नगर

समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो या भावनेतून मी काम करत आहे. स्नेहालयाच्या डॉ. गिरीश कुलकर्णींच्या माध्यमातून काम सुरू केले. समाजकार्य करताना अनेक समस्या समजल्या, समाजातील विविध दुर्लक्षित लोकांकरीता काही करता येईल हे मी पाहिले. ज्यांना गरज आहे, अशांसाठी स्नेहालय, अनामप्रेम संस्था अखंड काम करत आहे. या संस्था समाजासाठी प्रेरणादायी आहेत. घरातील संस्थेकडून होणारा सन्मान महत्त्वाचा वाटतो, असे प्रतिपादन डॉ. प्रकाश माधव शेठ यांनी केले.

डॉ. प्रकाश माधव शेठ यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त अनामप्रेमने अमृतमहोत्सव व अभिष्टचिंतन ...

डॉ. सायली सोमण म्हणाल्या, डॉ. प्रकाश माधव शेठ हे मातृहृदयी, अजातशत्रू असे व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचा ७५ वा वाढदिवस असला तरी ते मनाने व कामाने २५ वर्षांचे असल्यासारखे आहेत. या वयात देखील त्यांचा कामाप्रती असलेला उत्साह, फिटनेस व न कंटाळता कायम मार्गदर्शन करण्याची हातोटी या सर्व गोष्टी वाखाणण्यासारख्या आहेत. डॉ. प्रकाश माधव शेठ यांची महत्त्वाची इन्व्हेस्टमेंट म्हणजे त्यांचा असलेला प्रचंड मित्रपरिवार. आपण जन्माला आल्यानंतर काही आणत नाही मरताना काही घेऊन जात नाही यांची जाणीव सर्वांनाच नसते डॉ. प्रकाश माधव शेठ यांना मिळालेला प्रत्येक क्षण दुसऱ्याला कसे सुखी करता येईल यातच खर्च करतात ...



छत्रपती संभाजीनगर। दिव्यांग असताना लहानपणी इतरांचे बोट पकडून चालावे लागत असेल, परंतु आता तुम्हाला इतरांचे बोट पकडण्याची गरज नाही. आम्हीच तुमचे बोट पकडलेले आहे. दिव्यांगांनाही चांगले दिवस यावे असे मत सीए राजेंद्र झंवर यांनी व्यक्त केले. दिव्यांग दिनानिमित्त सूतगिरणी येथील अनामप्रेम येथे कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या वेळी अनामप्रेमचे जे.आर. मंत्रीसह आदींची उपस्थिती होती. संस्थेला कपडे, २ संगणक, ब्लाइंड चेस बोर्ड आणि खाद्यपदार्थ दिले.

जनप्रवास

## अंधांच्या जीवनातील 'पांढरी काठी' हा तिसरा डोळा : इंजि.अजित माने

अ.नगर
जनप्रवास । प्रतिनिधी

अंध व्यक्तीच्या आयुष्यात 'पांढरी काठी' ही तिसरा डोळा म्हणून काम करते अंधाने स्वत:ला कमजोर न समजता आपल्यातले उपजत गुण ओळखून जीवनाकडे सकारात्मकतेने पाहावे व जीवनात यशस्वी व्हावे सर्व विद्यार्थ्यांच्या पाठीमागे अनामप्रेम संस्था सतत उभी राहील असे प्रतिपादन अनामप्रेम संस्थेचे अध्यक्ष इंजि.अजित माने यांनी केले.

अनामप्रेम संस्थेतर्फे 'जागतिक पांढरे काठी' दिवस साजरा करण्यात आला यावेळी श्री.अजित माने बोलत होते.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ पत्रकार व अंध धावपट आहे. त्यांनी नियमितपणे अभ्यास करून आपल्या क्षेत्रात यशस्वी व्हावे, अनामप्रेम संस्था त्यांना सर्वतोपरी मदत करेल.

अजय धोपावकर म्हणाले मला वयाच्या ४४ व्या वर्षी अचानक अंधत्व आले.या संकटावर मात करण्यासाठी अनामप्रेम संस्थेचा मोठा आधार मिळाला त्यामुळे पुढे अंध असतानाही १५ मॅरेथॉन मध्ये सहभाग घेऊ शकलो. माझ्या जीवनात पांढऱ्या काठी मुळे दिशा व परिवर्तन होण्यास मदत झाली .

अनामप्रेम चे विद्यार्थी शुभम राऊत व द्वारका जोरवर यांची यावेळी भाषणे झाली. सूत्रसंचालन वसतिगृह प्रमुख श्री.अमृत भुसारी यांनी केले चेतन लांडगे यांनी आभार मानले

अनामप्रेम
www.anamprem.org
दिव्यांग बांधवांचा आशाकिरण

# लोकशाही प्रक्रियेत दिव्यांगांचा सहभाग –एक महत्त्वपूर्ण टप्पा



**स्नेहालय प्रेरित अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पा अंतर्गत वास्तव्यास असलेल्या दिव्यांग कार्यकर्ते व लाभार्थ्यांची सन संस्थेमार्फत प्रथमच मतदार नोंदणी करण्यात आली. ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी संस्थेने विशेष प्रयत्न केले.**

**नोंदणी झालेल्या एकूण १२ दिव्यांग कार्यकर्ते व लाभार्थ्यांनी यावर्षी त्यांच्या आयुष्यात प्रथमच मतदानाचा हक्क बजावला. यापूर्वी आपल्याला कधी मतदानाचा अधिकार मिळेल, अशी कल्पनाही अनेकांनी केलेली नव्हती.**

**मतदान प्रक्रियेत सहभागी होऊन सर्व दिव्यांगांमध्ये आत्मविश्वास, आनंद व सामाजिक जबाबदारीची भावना निर्माण झाली. हा उपक्रम दिव्यांगांचे लोकशाही प्रक्रियेत सशक्तीकरण करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला आहे.**



**अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पामध्ये सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. माणिक चौधरी साहेब, PSI श्री. भालेराव साहेब तसेच MIDC पोलीस स्टेशनचे पोलीस कर्मचारी यांच्या वतीने प्रकल्पातील सर्व दिव्यांग विद्यार्थ्यांना फळांचे वाटप करण्यात आले.**

**या प्रसंगी पाहुण्यांना ग्राम प्रकल्पात सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती देण्यात आली. संस्थेच्या कार्याची पाहणी करून त्यांनी संस्थेच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.**

**यावेळी दिव्यांगांनी तयार केलेला नॅपकिन बुके भेट देऊन संस्थेच्या वतीने PSI श्री. भालेराव साहेब यांचा सत्कार करण्यात आला.**

## भाऊबीज सणानिमित्त सामाजिक बांधिलकीचा संदेश



अनामप्रेम संस्था – सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथील परिसरात भाऊबीज सणाच्या निमित्ताने शेतकरी, मजूर व गुराखी बांधवांना अनामप्रेम परिवाराच्या वतीने मिठाईचे वाटप करण्यात आले. हा उपक्रम संस्थेचे कार्यकर्ते श्री. सुनील कांबळे व श्री. विक्रम प्रभू यांच्या हस्ते पार पडला. या उपक्रमाच्या माध्यमातून समाजातील गरजू घटकांपर्यंत सणाचा आनंद, आपुलकी व माणुसकीचा गोडवा पोहोचवण्याचा संस्थेचा उद्देश सफल झाला.



**अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पामध्ये दिवाळी सणानिमित्त लक्ष्मीपूजनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला.**

**या प्रसंगी प्रकल्पातील सर्व कार्यकर्ते उपस्थित होते. सामूहिक पूजनातून सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून संस्थेच्या कार्यात एकोपा व प्रेरणा वाढीस लागली.**

## डिजिटल साक्षरतेकडे भक्कम पाऊल : अनामप्रेम विद्यार्थ्यांची उल्लेखनीय कामगिरी






अनामप्रेम संस्थेतील विद्यार्थ्यांनी MS-CIT संगणक प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करून अंतिम परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. परीक्षेत सहभागी झालेली सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून त्यांनी चांगले गुण मिळवून संस्थेचे नाव उज्ज्वल केले आहे.

या विद्यार्थ्यांपैकी अनेकांना प्रथमच संगणक शिक्षणाची संधी मिळाली होती. सुरुवातीला संगणक हाताळताना भीती व संकोच जाणवत असतानाही संस्थेच्या योग्य मार्गदर्शनामुळे आणि सातत्यपूर्ण सरावामुळे त्यांनी आत्मविश्वासाने हे प्रशिक्षण पूर्ण केले.

MS-CIT प्रशिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांना संगणकाचे मूलभूत ज्ञान, इंटरनेटचा प्रभावी वापर तसेच शासकीय व खासगी सेवांमध्ये आवश्यक असणारी डिजिटल कौशल्ये आत्मसात करता आली. या कौशल्यांमुळे त्यांच्या रोजगाराच्या संधी वाढण्यास मदत होणार असून आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करण्यासाठी हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरणार आहे.

अनामप्रेम संस्थेचा उद्देश केवळ निवारा व मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे नसून, दिव्यांग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम व स्वावलंबी बनवणे हा आहे. विद्यार्थ्यांचे हे यश संस्थेच्या कार्याला नवी प्रेरणा देणारे असून भविष्यात अशा अनेक शैक्षणिक उपक्रम राबवण्याचा संस्थेचा संकल्प अधिक दृढ झाला आहे.

## प्रजासत्ताक दिनानिमित्त अनामप्रेममध्ये दुचाकी भेट



२६ जानेवारी प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने अरुण भाई शेठ यांच्या सहकार्याने अनामप्रेम संस्थेतील अस्थिव्यंग कर्मचाऱ्यास नवीन दुचाकी भेट देण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते दुचाकीची चावी प्रदान करण्यात आली.

या उपक्रमामुळे संबंधित कर्मचाऱ्याच्या दैनंदिन कामकाजात सुलभता निर्माण झाली असून त्यांना नव्या उत्साहाने कार्य करण्यासाठी प्रेरणा मिळाली.

# अनामप्रेम

दिव्यांग बांधवांचा आशाकिरण

## अनामप्रेमच्या शिरपेचात मानाचा तुरा :
## कुमारी श्रावणीचा शासकीय सेवेत गौरवशाली प्रवेश




अंशतः अंध असूनही अथक जिद्द, चिकाटी आणि परिश्रमाच्या जोरावर कुमारी श्रावणी हिने स्पर्धा परीक्षेत यश संपादन करून सांख्यिकी विभाग, अहमदनगर येथे शासकीय सेवेत प्रवेश मिळवला आहे. तिचे हे यश अनामप्रेम संस्थेसाठी अभिमानास्पद असून अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे.

## झिपरू बालनाट्य कलाकार श्री. शेखर नाईक यांची
## अनामप्रेम सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पाला सदिच्छा भेट

पुणे येथील “या चिमण्यांनो” बालनाट्य टीमचे सुप्रसिद्ध कलाकार श्री. शेखर नाईक साहेब यांनी अनामप्रेमच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पाला सदिच्छा भेट दिली. त्यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांशी संवाद साधून त्यांच्या प्रगतीचे कौतुक केले तसेच संस्थेच्या शैक्षणिक व स्वावलंबन उपक्रमांची माहिती घेतली. भविष्यात सांस्कृतिक व प्रेरणादायी कार्यक्रमांसाठी सहकार्य करण्याची त्यांनी सकारात्मक भावना व्यक्त केली.









# जागतिक पांढरी काठी दिन : आत्मविश्वास आणि प्रेरणेचा उत्सव अनामप्रेममध्ये साजरा




अनामप्रेम संस्थेत जागतिक पांढरी काठी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्ष इंजी. अजित माने यांनी पांढऱ्या काठीचे अंध व्यक्तीच्या जीवनातील स्वाभिमान व स्वावलंबनाचे प्रतीक म्हणून महत्त्व अधोरेखित केले. प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पत्रकार व अंध धावपटू श्री. अजय धोपावकर यांनी आपल्या प्रेरणादायी अनुभवातून विद्यार्थ्यांना जिद्दीने पुढे जाण्याचा संदेश दिला तसेच नेत्रदानाबाबत महत्त्वपूर्ण जनजागृती केली.

# सेवेचा पहिला टप्पा यशस्वी : अनामप्रेम मराठवाडा प्रकल्पाचा प्रथम वर्धापन दिन उत्साहात

अनामप्रेम संस्थेच्या मराठवाडा प्रकल्पाचा पहिला वर्धापन दिन उत्साहात आणि अभिमानाने साजरा करण्यात आला. या एका वर्षात गरजू दिव्यांग व्यक्तींच्या सर्वांगीण पुनर्वसनासाठी विविध सामाजिक, शैक्षणिक व सहाय्यक उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात आले.

या प्रकल्पामुळे संस्थेच्या सेवाकार्याची व्याप्ती अधिक विस्तारली असून, भविष्यात अधिक व्यापक आणि परिणामकारक उपक्रम राबविण्याचा दृढ संकल्प यानिमित्ताने व्यक्त करण्यात आला.



## दिवाळी निमित्त सामाजिक बांधिलकीचा उपक्रम : किराणा किट वाटप







दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर संस्थेतील विद्यार्थी लाभार्थी तसेच परिसरातील गरजू दिव्यांग व्यक्तींना जीवनावश्यक किराणा किटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाद्वारे सणाचा आनंद सर्वांपर्यंत पोहोचवण्याचा आणि गरजूंना आवश्यक अन्नधान्याची मदत करण्याचा संस्थेचा सामाजिक बांधिलकी जपणारा प्रयत्न यशस्वीपणे राबविण्यात आला.

## इंडियन मेडिकल असोसिएशनतर्फे अनामप्रेममध्ये आरोग्य शिबिर

इंडियन मेडिकल असोसिएशन यांच्या वतीने अनामप्रेम संस्थेत आरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांची तज्ञ डॉक्टरांकडून सविस्तर वैद्यकीय तपासणी करण्यात आली. आवश्यकतेनुसार औषधोपचार देण्यात आले तसेच पुढील उपचार व आरोग्यविषयक मार्गदर्शन करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत सजगता वाढून त्यांच्या सर्वांगीण कल्याणासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले गेले.



# पालकांचे मनोगत



मी काकासाहेब राम कोळेकर, मु.पो. अर्ध पिंपरी, ता. गेवराई, जि. बीड येथील रहिवासी आहे. माझा मुलगा अविनाश कोळेकर हा अनामप्रेम संस्थेमध्ये शिक्षण घेत आहे. त्याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आमच्या गावाजवळील जिल्हा परिषद शाळेत पूर्ण झाले.

माझा मुलगा डोळ्यांनी ७० टक्के अंध असल्यामुळे त्याच्या पुढील शिक्षणाबाबत आम्हाला चिंता होती. अशा वेळी त्याने इयत्ता ११ वीमध्ये अनामप्रेम संस्थेत प्रवेश घेतला.
संस्थेत आल्यानंतर त्याचा आत्मविश्वास वाढला असून शैक्षणिक व वैयक्तिक विकास स्पष्टपणे दिसून येतो. शिक्षकांचे मार्गदर्शन, शिस्तबद्ध वातावरण व निवासी सुविधा यामुळे त्याला योग्य दिशा मिळाली.
सध्या तो टी.वाय.बी.ए. (T.Y.B.A.) मध्ये शिक्षण घेत असून स्वावलंबनाकडे वाटचाल करीत आहे, ही आमच्यासाठी अत्यंत आनंदाची व अभिमानाची बाब आहे.
अनामप्रेम संस्थेचे सर्व पदाधिकारी, शिक्षक व कार्यकर्ते यांचे आम्ही मनःपूर्वक आभार मानतो.

— काकासाहेब राम कोळेकर
(अविनाशचे पालक)

---

# यशस्वी विद्यार्थी – मनोगत



मी गणेश श्रीधर दहिफळे, रा. महिंदा, ता. आष्टी, जि. बीड.

मी २०१४ साली इयत्ता ९ वीमध्ये अनामप्रेम संस्थेत प्रवेश घेतला आणि २०१८ साली इयत्ता १२ वी पूर्ण केली.
संस्थेत आल्यावर माझ्या आयुष्यात सकारात्मक बदल घडू लागले. येथे मला केवळ शालेय शिक्षणच नाही, तर आत्मविश्वास, शिस्त आणि स्वतःच्या क्षमतेवर विश्वास ठेवण्याची शिकवण मिळाली. शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्थेचे प्रेरणादायी वातावरण यामुळे माझ्या करिअरला योग्य दिशा मिळाली.

१२ जून २०२३ रोजी मला युनियन बँक ऑफ इंडिया मध्ये कस्टमर सर्व्हिस असोसिएट म्हणून नोकरी मिळाली. आज मी स्वतःच्या पायावर उभा आहे, याचा मला अभिमान वाटतो.
माझ्या या यशामागे अनामप्रेम संस्थेचे मोठे योगदान आहे. संस्थेचा मी मनापासून आभारी आहे.

# अनामप्रेमचे मार्गदर्शक


श्री. सुवालालजी शिंगवी
सी.ए. सतीश सोमण
सौ. वैशाली चेके
श्री. बाळासाहेब भोरे
डॉ. सुवर्णा गणवीर
श्री. अविनाश मुंडके
श्री. यशवंत कुरापट्टी

श्री. संजय गुगळे
श्री. मिलिंद कुलकर्णी
सौ. शीला संचेती
सौ. मिना बेदरकर
डॉ. मार्सिया वॉरन
श्री. दीपक बुरम
श्री. अमित डोईफोडे

श्री. राजीव सिंग
श्री. दिपक देशपांडे
सौ. अनिता माने
श्री. अजित बेदरकर
डॉ. अभिजीत बोरुडे
श्री. उमेश पंडुरे
श्री. फिरोज तांबटकर

सौ. ज्योती एकबोटे
श्री. राजीव गुजर
डॉ. हेमंत देशपांडे
श्री. किशोर कुलकर्णी
डॉ. चेतना बहुरूपी
प्रा. प्रमोद तांबे
श्री. शशिकांत सातभाई

# अनामप्रेमचे सेवाव्रती


अभय रायकवाड


विष्णु वारकरी



रामदास काकडे


विक्रम प्रभु


प्रविण नवले


भारती सोनवणे


राहुल खिरोडे


सुनिल कांबळे



सुरेखा राठोड


सुरेखा कोतकर


माधवी सैंदाणे


रामु बांडेबुचे


राजु भगत


अमृत भुसारी


प्रकाश गजे


शुभांगी वारकरी



मनोज दंडीमे


बद्रिनाथ कुटे


पोपट लोंढे



पल्लवी मकासरे


अक्षयकुमार राऊत



शिवानंद राऊत



शिवलाल पाल


मुंजाजी गालफडे


संतोष फुलसौंदर


सचिन गारदे


विद्या रानवडे


रोहित लाटणे

## लेखापरीक्षण अहवाल

The Bombay Public Trust Act, 1950
Schedule IX [Vide Rule 17 (1)]

Name of the Public Trust : Anamprem

Registration No : MAH/065/06/AHMEDNAGAR; AF9992

**Income and Expenditure Account for the year ended**

| Expenditure | 31-Mar-2024 Amount (Rs) | 31-Mar-2024 Amount (Rs) | Income | 31-Mar-2024 Amount (Rs) | 31-Mar-2024 Amount (Rs) |
|---|---|---|---|---|---|
| ***Expenditure in respect of properties*** | | | *Interest* | | |
| Rates & Taxes | 3,11,305 | | Realised | | |
| Repairs & Maintenance | 14,50,310 | | - On Bank Account | | 252 |
| Other expenses | - | 17,61,615 | - On Deposits | | 3,89,058 |
| | | | Other | | - |
| ***Establishment Expenses*** | | | Accrued | | |
| | | | - On Deposits | | 2,68,634 |
| Audit Fees | 25,000 | | | | |
| Depreciation | - | | **Donation Received** | | 1,39,86,074 |
| Legal Expenses | - | 25,000 | | | |
| | | | **Other Income** | | - |
| | | | - Grant Received | | 9,57,133 |
| ***Expenditure on object of the Trust*** | | | | | |
| Educational | 3,45,308 | | | | |
| Medical Relief | 1,42,423 | | | | |
| Animal Welfare Expenses | 7,28,655 | | | | |
| Any other object of general public utility | 4,84,624 | | | | |
| Relief of poor | 12,095 | | | | |
| Others | 75,28,329 | | | | |
| Promotion of Sports | - | | | | |
| Promotion of Art | - | | | | |
| Donation to another trust | - | 92,41,434 | | | |
| Surplus carried to Balance Sheet | | 45,73,102 | | | |
| **Total** | | **1,56,01,151** | **Total** | | **1,56,01,151** |

As per our report of even date
Sukrut Dewarde & Associates
Chartered Accountants
Firm Registration No. 153539W

Sukrut Dewarde
Membership No. 170109
Place: Pune
Date: 29th September 2024
UDIN : 24170109BKEJTU5841

The above Balance Sheet to the best of my / our belief contains a true account of the Funds and Liabilities and of the Property and / Assets of the Trust.

For Anamprem

Trustee
Place: Ahmednagar
Date: 29th September 2024

Trustee
Place: Ahmednagar
Date: 29th September 2024

## लेखापरीक्षण अहवाल

**The Bombay Trust Act, 1950**
**Schedule VIII [vide Rule 17(1)]**

Name of the Public Trust : Anamprem

Registration No : MAH/065/06/AHMEDNAGAR; AF9992

**Balance Sheet as at**

| Funds and Liabilities | 31-Mar-2024 Amounts (Rs) | 31-Mar-2024 Amounts (Rs) | Property and Assets | 31-Mar-2024 Amounts (Rs) | 31-Mar-2024 Amounts (Rs) |
|---|---|---|---|---|---|
| ***Trusts Fund or Corpus*** | | | ***Property, Plant and Equipment*** | | 5,12,04,460 |
| Balance as per last Balance Sheet | 16,70,748 | | As per schedule attached | | |
| Add: Utilisation | 15,00,000 | | | | |
| Add: Donation recived towards Corpus | - | 31,70,748 | | | |
| ***Other Earmarked Funds*** | | | ***Investments*** | | |
| Balance as per last Balance Sheet | 3,96,54,610 | | As per schedule attached | | 1,03,31,327 |
| Add : Donation Received | - | | | | |
| Add : Transfer from I & E Account | - | | (The market value of the above Investments | | |
| | 3,96,54,610 | | Rs. 1,03,31,327) | | |
| Less : Utilisation Tr to I & E Account | - | | | | |
| Less : Utilisation Tr to Corpus Fund | - | 3,96,54,610 | | | |
| ***Liabilities*** | | | ***Current Assets*** | | |
| For Expenses | 7,43,338 | | Advances & Loans | 66,279 | |
| TDS Payable | 659 | | Tax deducted as source & refunds | 1,37,200 | |
| Salary Payable | - | | Grant Receivable | 19,305 | |
| Profession Tax Payable | - | | | | |
| Advances | - | 7,43,997 | **Bank Balance** | | |
| | | | In saving | 11,417 | |
| | | | In current | 14,91,616 | |
| | | | **Cash in Hand** | 11,969 | 17,37,786 |
| ***Income & Expenditure Account*** | | | | | |
| Balance as per last Balance Sheet | 1,41,16,863 | | | | |
| Add : Surplus / (Deficit) as per I & E Account | 45,73,102 | | | | |
| Add : Prior year adjustments | 10,14,254 | | | | |
| Add : Transfer from other Earmarked Funds | - | | | | |
| Less : Transfer to other Earmarked Funds | - | 1,97,04,218 | | | |
| | | **6,32,73,573** | | | **6,32,73,573** |

As per our report of even date
Sukrut Dewarde & Associates
Chartered Accountants
Firm Registration No. 153539W

Sukrut Dewarde
Membership No. 170109
Place: Pune
Date: 29th September 2024
UDIN : 24170109BKEJTU5841

The above Balance Sheet to the best of my / our belief contains a true account of the Funds and Liabilities and of the Property and / Assets of the Trust.

For Anamprem

Trustee
Place: Ahmednagar
Date: 29th September 2024

Trustee
Place: Ahmednagar
Date: 29th September 2024

# अनामप्रेमचे सहयोगी

स्थापना 2005
अनामप्रेम

- Suraz Family Trust
- Mohatta Foundation
- Dr. Ravindra Marathe
- Dr. Ravindra Somani
- Mrs.Pramila Kulkarni
- Vatsalya Trust
- Shankar Maharaj Trust
- We Together Foundation

स्थापना 2005

अनामप्रेम



| | |
|---|---|
| Bank Name | State Bank Of India |
| Name Of Account | ANAMPREM |
| Branch | Kalyan road ( SME ),<br>Ahilyanagar (Ahmednagar) |
| Account No | 32144934687 |
| Account Type | Current |
| IFSC Code | SBIN0014794 |

आपण देणगी ऑनलाईन जमा केल्यावर पावतीसाठी आपले नाव, पॅन नंबर, पत्ता, मेल आयडी व फोन नंबर ही माहिती संस्थेला anampreminfo@gmail.com या मेल वर अथवा 9011004576 या संपर्क क्रमांकावर कळवावे.